11 May 2009

ॐ श्री परमात्मने नमः ।।

- कर्मयोग -

अध्याय ३ रा

'कोणीही मनुष्य एक क्षणमात्रसुद्धा कर्माशिवाय राहू शकत नाही' हा एक अतिशय महत्वाचा सिद्धांत भगवंतांनी येथे सांगितला आहे. असे असल्यामुळे कोणते कर्म करावे आणि कोणते त्यागावे हे मानवाला कळले पाहिजे. मानवाने नित्य व नैमित्तिक कर्मे करावीत आणि काम्य-निषिद्ध कर्मे टाळावीत. स्वकर्म म्हणजे यज्ञकर्म होय. यज्ञकर्म स्वार्थत्यागावर आधारलेले असते. त्यामुळे सृष्टीचे संतुलन उत्तम राहते. जो यज्ञकर्म वा स्वकर्म आचरत नाही तो चोर असतो. स्वकर्म आचरण्याची आज्ञा वा नियम स्वतः ब्रह्मदेवानेच घालून दिला आहे. स्वकर्म आचरूनच जनकादिकांसारख्या श्रेष्ठजनांनी परमसिद्धी मिळवली. श्रेष्ठजन जो मार्ग आचरतात तोच मार्ग सामान्य जन अनुसरतात. म्हणून श्रेष्ठांनी सदाचारयुक्त कर्मे आचरावीत. स्वकर्म निष्कामपणे आचरले तर ते स्वधर्मात पालटते. स्वधर्म श्रेष्ठ तर परधर्म भयावह आहे. या स्वधर्माचरणातील दोन प्रमुख अडथळे म्हणजे काम आणि क्रोध! क्रोध कामापोटी जन्मतो म्हणून प्रथम काम जिंकावा. तात्पर्य, कर्म कसे आचरावे आणि स्वकर्म स्वधर्मात कसे पालटावे याचे अवघे रहस्य भगवंतांनी या अध्यायात उलगडले आहे म्हणून या अध्यायाचे कर्मयोग हे नाव सार्थ आहे.

| March Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

## कर्मबंधन म्हणजे काय?

कर्तृत्वाचा अहंकार आणि कर्मफळाची आसक्ती हे कर्मबंधन होय - असे ज्ञानेश्वर माऊली म्हणतात. या दोन गोष्टी टाळणे म्हणजे यज्ञार्थ कर्म करणे.

विनोबाजी म्हणतात - कर्म अग्रस्थानी तर अहंकार केंद्रस्थानी असतो. अहंकार मोठा झाला की कर्माची किंमत कमी होते आणि अहंकार जसजसा छोटा होत जातो तसतशी कर्माची किंमत वाढते. त्यामुळे कार्य कितीही मोठे नि सुंदर असो, ते 'मी केले' 'मी असा आहे' असा मीचा जप ऐकू येऊ लागला तर त्या व्यक्तीबद्दल तिरस्कारच वाटतो. त्या व्यक्तीचा अहंकार त्या स्वतःलाच संकुचित बनवतो. मी चे मोठेपण 'मी' ला विसरण्यात आहे. स्वामी विवेकानंद एकदा म्हणाले होते. अहंकाराची आहुती हा सर्वात मोठा यज्ञ!

महान कार्य हे अनेकांच्या सहकार्याशिवाय होत नाही. लोकमान्य टिळक यांनी घोषणा केली की 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!' परंतु स्वराज्याचे काम एवढे प्रचंड होते की त्यांच्या हयातीत ते पूर्ण होऊ शकले नाही. त्यांनी त्याचा वाटा उचलला पण स्वराज्य माझ्यामुळे मिळेल असे ते म्हणाले नाहीत.

निरहंकारी होऊन कर्मे करणे म्हणजेच यज्ञार्थ केलेली कर्मे ही बंधनकारक ठरत नाहीत.

© www.madhaveeraghuveer.com

9.00 सूर्य - निसर्गातील कार्ये सूर्यशक्तीवर चालतात पण
त्याचा अहंकार (किंवा मी करतो ही भावनासुद्धा)
10.00 सूर्याला नाही. तशीच स्थिती शरीरात आहे. शरीर
हा निसर्ग असून आत्मा हा सूर्य आहे.
11.00 बी पेरणे, पाणी घालणे एवढेच आपल्या
हातात परंतु त्याला अंकुर फुटणे, पान फुटणे,
12.00 वृक्ष होणे, फलधारणा होणे यात आपण कार्य
करतो? सारा विकास निसर्गतःच होत असतो.
1.00 त्रिगुणाच त्रिगुणांना गतिमान करून विकसित होत
असतात (३.२७,२८)
2.00 भगवंत या ठिकाणी ३ नियम सांगतात.
१. कर्म करायचं आहे. २. ते कर्म मी केलं असा
3.00 अहंकार बाळगायचा नाही. ३. कर्माच्या फळाची
आसक्ती ही ठेवायची नाही.
4.00

सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर, अमिताभ बच्चन
5.00 मदर टेरेसा, बाबा आमटे

6.00

7.00

8.00

© www.madhuveeraghuveer.com

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

Work is worship कर्म हीच उपासना।

सर्व संत विणकाम (कबीर) कुंभारकाम (गोरा कुंभार) दळणकांडण (जनाबाई) न्हावी (सेना) सोनार (नरहरी) अशी कामे करीत करीतच मुक्त झाले आहेत.

प्रत्यक्ष भगवंतही घोड्यांचा खरारा करीत, पीतांबरात चंदी घेऊन घोड्यांना देत असत. कर्म हे चित्तशुद्धीचे साधन आहे. कर्मयोगी व्यापारी सुद्धा समाजोपयोगी कामे करीत असतो. तुळाधार वैश्याची कथा - तराजूच्या दांडीमधून त्याला अध्यात्मिक भाषा स्फुरली. सेना न्हावी, गोरा कुंभार यांना आपापल्या व्यवसायातून परमार्थाचे स्फुरण झाले. अनुक्रमे डोक्यातील मळ, जीवनाचे पक्के मडके. तीच त्यांची कर्मे म्हणजे अध्यात्मशाळा होत्या. दिसायला व्यावहारिक परंतु अंतरी अध्यात्मिक.

अशा कर्मयोग्यामुळे समाजाला आदर्श मिळतो तो स्वयंतृप्त असतो पण तरीही कर्म करीतच राहतो. शिखरावर गेल्यानंतरही शिडी सोडायची नसते.

कर्मयोगी फळाची आशा सोडून जर कर्मे करेल तर त्याला अनंत फळे मिळतील

१. त्याची शरीरयात्रा चालेल
२. शरीर व बुद्धी सतेज राहील
३. समाज सुखी होईल.
४. चित्तशुद्धी होऊन त्याला ज्ञान मिळेल
५. समाजात आदर्श निर्माण होईल

© www.madhaveeraghuveer.com

न मागे त्याची रमा होय दासी।

स्वयंवरात लक्ष्मीने विष्णूला वरले कारण ज्याला माझ्याशी विवाह करण्याची इच्छा नसेल त्यालाच मी माळ घालेन असा तिचा पण होता. असाही भगवान् विष्णु इतका निरिच्छ वर शोधूनही सापडणार नाही.

परंतु क्षुद्र फळाच्या अपेक्षेने जो काम करतो तो अनंत फळही गमावून बसतो. भिकाऱ्याला काय हवे ते माग म्हटल्यावर तो माझी झोळी फाटकी आहे तर मला नवीन झोळी दे असे म्हणतो. वास्तविक देणारा इतका भरभरून देत असताना करंटेपणाने क्षुद्र गोष्ट मागणे म्हणजे केवढे दुर्दैव परंतु क्षुल्लक फायद्याला भुलून खूप मोठे फळ (शाश्वत, चिरंतन) गमावणे ही शोकांतिका आहे.

कर्म हेतूप्रमाणे असते. या कागदाच्या कपट्याला किंमत नसते, त्यावरील शिक्क्याला असते. फुलाला, तुळशीपत्राला कि वजन नाही पण त्यातील भक्ती महत्त्वाची

©www.madhaveeraghuveer.com

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

कर्मयोगात बुद्धीच्या दृढनिश्चयाला प्राधान्य आहे. दृढ निश्चय असेल तर बुद्धी सहजच सम होऊन जाते. म्हणून निश्चयात्मक बुद्धी आवश्यक आहे.

आपल्याच आग्रहाला चिकटून असलेला श्रोता वक्त्याचे म्हणणे समजून घेऊ शकत नाही. अर्जुनाने युद्ध न करण्याचा आग्रह कायम ठेवल्यामुळे त्याला भगवंतांचे म्हणणे व्यर्थी वाटत होते. गोंधळात टाकणारे, मिश्रित असे वाटत होते म्हणून तो प्रश्न विचारत आहे —

(१) कर्म व बुद्धी यांतील श्रेष्ठ काय? आणि जर कर्मापेक्षा बुद्धी श्रेष्ठ असे तुमचे म्हणणे असेल तर मला हे भयंकर कर्म करायला का भाग पाडत आहात?

पण तरीसुद्धा मृदु स्वभावाचा, सात्त्विक वृत्तीचा अर्जुन पुन्हा म्हणतो —

(२) श्रेयस्कर काय आहे? माझे कल्याण कशात आहे ते मला एकदा निश्चितपणे सांगा.

अर्जुन अतिशय सरळ वृत्तीचा आहे. काय केल्यामुळे माझे कल्याण होईल असे त्याने विचारले यातच त्याची निष्पापता दिसून येते. म्हणून पुढील श्लोकात भगवान त्याला अनघ म्हणतात.

(३) भगवंत त्याला द्विविधा निष्ठा सांगतात.

या दोन निष्ठा नाहीत तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भगवंतांनी यापूर्वी समत्वबुद्धी

© www.madhaveeraghuveer.com

सांख्ययोगाच्या अनुषंगाने म्हणजे ११ ते ३०या श्लोकात तर कर्मयोगाच्या अनुषंगाने ३१ ते ५३ मध्ये सांगितली होती. तरीपण कोणत्याही निष्ठेत कर्माच्या त्यागाविषयी सांगितले नव्हते. या ठिकाणी भगवंत द्विविधा निष्ठा सांगत आहेत. ज्ञानयोग आणि कर्मयोग. [निष्ठा म्हणजे श्रद्धापूर्वक स्वीकारलेली जीवनव्रताची दिशा] ती सुखाशी किंवा दुःखाशी निगडित नसून तत्त्वाशी निगडित असते. निष्ठा ही अव्यभिचारी हवी. राजकीय नेत्याची निष्ठा अनेक ठिकाणी विभागलेली असते. तशी निष्ठा खरी नव्हे. निष्ठा माणसाला लवायला लावते. जेवढे लवाल तेवढे उंच व्हाल. - ज्ञानेश्वर माऊली. सांख्य म्हणजे आत्मानात्मविवेकी अर्जुनाला अद्यापि तो विवेक झाला नाही परंतु आत्मज्ञानाची तीव्र इच्छा आहे. म्हणून भगवंत त्याला कर्ममार्ग सांगतात. त्याने तो आचरावा अशी भगवंताची इच्छा आहे.

(४) नुसते कर्म न करणे म्हणजे नैष्कर्म्य नव्हे. कर्माला ज्ञानाचे डोळे आणि भक्तीचे अंतःकरण हवे. कर्माचा विश्वात्मक विचार असावा. ज्ञान होत नाही तोवर कर्म करावेच लागते.

कामनारहित होऊन कर्म केले तर त्याचे बंधन पडत नाही. त्याचे फळ भोगावे लागत नाही. ज्याप्रमाणे भाजलेल्या बीजातील अंकुरणक्षमता नष्ट होते तसे परंतु कर्माचे आचरण अपरिहार्यच आहे.

Sunday 19

© www.radhaveeraghuveer.com

(५) माणसाची प्रकृती त्रिगुणात्मक आहे. कर्मे प्रकृतीच्या आधीन असल्याने मनुष्याला कर्मे करावीच लागतात काही केले नाही तरी बसण्याची झोपण्याची क्रिया चालूच रहाते. मनात संकल्प विकल्प सुरूच असतात. त्यामुळे एक क्षणभरही कोणीही कर्म केल्याविना राहू शकत नाही.

(६) जो हट्टाने इंद्रियांना आवरून मनाने विषयांचे चिंतन करीत असतो त्याला दांभिक म्हटले आहे. येथे कर्मेंद्रियांमध्येच ज्ञानेंद्रियेही अंतर्भूत आहेत. बाहेरून भोगांचा त्याग करून जर तो मनाने ते भोग भोगत असेल तर अधिक हानि होते कारण मनाने भोग भोगण्यासाठी विशेष अवसर मिळतो. म्हणून मनाने भोगांचा त्याग हाच वास्तविक त्याग आहे. (२.६४)

(७) परंतु याच्या अगदी उलट जो मनाने इंद्रियांना वश करून - अनासक्त राहून कर्मेंद्रियांनी कर्मयोगाचे आचरण करतो तोच श्रेष्ठ होय. मागील श्लोकात व या श्लोकात विरोधाभास दाखवण्यासाठी 'तु' हे पद वापरले आहे. त्याचप्रमाणे येथे अर्जुन - सरळ मनाला - हे संबोधन योजले आहे.

संयम - इंद्रियांना हट्टाने रोखून

नियम्य - शास्त्रमर्यादेनुसार इंद्रियांचे नियमन करून. नियमन झाल्यास इंद्रियांचा संयम आपोआप होतो.

कर्माचा योग साधण्यासाठी त्यातील आसक्ती टाकावी लागते. जैसा संसर्गामाजि असे। सकळांसारिखा दिसे।
जैसे तोयसंगे आभासे। भानुबिंब ॥ - ज्ञानेश्वरी

© www.madhaveeraghuveer.com

अनासक्त कर्मयोगासाठी मनोविजय आवश्यक आहे. दांभिकपणाचे निवारण करणे करावे आणि ज्ञाननिष्ठा करी प्राप्त करून घ्यावी हे युक्तीने श्रीकृष्ण सांगत आहेत.

(२) स्वकर्म म्हणजे स्वधर्म!

आपला स्वभाव जो व्यापार ।
नेमे आचरावे खबरदार ॥

नित्यकर्मे जर निष्ठेने आचरली तर अवश्यांचे कल्याण होईल. कर्मविपाक सिद्धांत ——

तुझ्या कर्मविपाकाप्रमाणे तुला जन्म मिळाला आहे. मनुष्य कर्मात स्वतंत्र आणि भोगात परतंत्र आहे. जसे पेराल तसे उगवेल. हिरा आणि कोळसा दोन्हीत कार्बन आहे. कार्बनचा उपयोग कशासाठी करायचा हे तुम्ही ठरवा. पाणी तटस्थ आहे. ते केळीच्या बागेला मिळाले तर केळीची बाग तरेल. तंबाखूला मिळाले तर तंबाखू येईल.

कर्मत्यागाने अनर्थ होईल पण कर्मफलत्यागाने पारमार्थिक लाभ होईल. थोडक्यात नित्य कर्मे टाकू नयेत फक्त ती निष्काम भावनेने करावीत.

(३) कर्म ईश्वरार्पण बुद्धीने करावे. कर्तव्यबुद्धीने केलेले कर्म मानवाला उन्नत तर करतेच पण समाजाचे, राष्ट्राचेही हित करते. असे कर्म सर्व प्राण्यांना कर्मबंधनातून मुक्त करते. त्या आचरणामुळे मोक्षप्राप्ती होते. यज्ञो वै विष्णुः। असे श्रुतिवचनच आहे. यज्ञ विष्णुरूपच आहे. जे कर्म ईश्वराच्या आराधनेसाठी केले जाते ते यज्ञकर्म ठरते. आणि

©www.madhaveeragluveer.com

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

9.00 मोक्षप्राप्तीसाठी अनायासे मदत करते.
स्मृतिशास्त्रात कर्माची व्याख्याच मुळी अशी
10.00 आहे - तत्कर्म यन्न बन्धाय म्हणजे जे
बंधनाचे कारण होत नाही तेच खरे कर्म
11.00 मुक्तसङ्गः समाचर याचा भावार्थ त्यागमय कर्म
हाच आहे. ईशोपनिषदात सुद्धा
12.00 तेन त्यक्तेन भुञ्जीथाः असे म्हटले आहे.
म्हणजे त्यागपूर्वक भोग घ्या.
1.00 (१०) वृक्षाला जशी फळे येतात तशी धर्माचरणालाही
येतात. वांछित मनोरथ पूर्ण करणारा (यज्ञ)
2.00 म्हणून इष्टकामधुक् असा शब्द योजला आहे.
प्रजापती म्हणजे ब्रह्मदेव
3.00 सृष्ट्वा म्हणजे निर्माण करून असा अर्थ आहे.
प्रसविष्यध्वम - तुम्ही सर्वांची वृद्धी करा.
4.00 अनेन - आपल्या कर्तव्य कर्मा द्वारा
भावयन्तु - प्रगती करतील.
5.00 अवाप्स्यथ - प्राप्त व्हाल.
हे सर्व जग यज्ञमयच आहे.
6.00 (११) देवता तृप्त तरच मानव तृप्त!
परस्परांनी संतोषवृद्धी होईल यातच परम श्रेय आहे.
7.00 परम श्रेय प्राप्त करण्यासाठी निष्काम कर्मयोग
आचरावा. त्याने चित्तशुद्धी होते. चित्तशुद्धीने
8.00 सत्त्वगुण वाढतो. सत्त्वगुणाने अभीष्टसिद्धीचा लाभ
होतो. त्याने मानव आत्मतृप्त होतो.
यज्ञाने केवळ पारलौकिकच नव्हे तर ऐहिक फळही मिळते.

©www.madhukeeragruveer.com

(३२) यज्ञामुळे देव तृप्त झाले की न मागताही प्रिय भोग मिळतील. त्यांनी दिलेल्या भोगांना जो पुरुष त्यांना न देताच स्वतः उपभोगतो तो खरोखरीच चोर होय. जो स्वार्थी तो चोर!

म्हणऊनि स्वधर्मु जो सांडील।
तयाते काळु दंडील।
चोर म्हणुनी हरील
सर्वस्व तयाचे॥

सृष्टीची, समाजाची धारणा व्हावी म्हणून त्यागमय कर्म करावे लागते. ते पंचयज्ञ ... आचरून करता येते.

(३) ~~कोणते यज्ञ~~ -

कंडनी पेषणी चुल्ली उदकुंभी च मार्जनी।
पंच सूना गृहस्थस्य ताभिः स्वर्गं न विन्दति॥

कांडण, दळण, चूल पेटवणे, उदक आणणे आणि सडासंमार्जन करणे या पाच हिंसा गृहस्थाश्रमात घडत असतात. ही हिंसामूलक पातके निवारण्यासाठी उपाय सांगितला आहे. या पातकांचा नाश पाच यज्ञांनी करता येतो.

पंचसूना कृतं पापं पंच यज्ञैर्व्यपोहति।

(१) ब्रह्मयज्ञ - रोज थोडे तरी अध्ययन आणि अध्यापन करणे म्हणजे ब्रह्मयज्ञ.

(२) पितृयज्ञ - आपल्या पूर्वजांकडून वारशाने जे मिळाले ते अधिक समृद्ध करून, संपन्न करून पुढील पिढीकडे सोपवायचे हा पितृयज्ञ किंवा ऋषियज्ञ!

©www.madhaveeraghuveer.com

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

आपल्याला जे मिळाले असेल त्यात किमान २५ %
वाढ आपण करू शकतो म्हणूनच म्हणतात
बापसे बेटा सवाई!

(3) देवयज्ञ - होम केल्याने देवयज्ञ साधला जातो.
प्रत्येक मनुष्य देवाचा अंश आहे. म्हणून केवळ
सात्विक कार्याचा अनुसरा सद्गुणांची कास धरा.
जे कार्य केल्यामुळे मन विषण्ण होईल.
अंतःकरणात खिन्नता निर्माण होईल असे
कोणतेही काम न करणे.

(4) भूतयज्ञ - माझे कर्तृत्व शून्य आहे ही भावना
हवी. व्यक्तीला ओळखून हेवा वाटला की तिथे
कर्तृत्वाचा अहंकार येतो आणि तो एकदा आला
की तो इंद्रियदमन करायला विसरतो आणि
विषयासक्त होतो, अधोगतीला जातो.

(5) नृयज्ञ - म्हणजे प्राधान्याने अतिथिसत्कार. आपण
समाजाचे काही देणे लागतो हा विचार मनात
सतत जागृत असावा. दुसऱ्याच्या श्रमाची,
वेळेची, पैशाची कदर असावी. Respect Others!
हे पाचही नित्ययज्ञ माणसाने लक्षात ठेवून
करावेत याशिवाय इष्टि यज्ञ असे इतरही यज्ञ
करावेत असे. यज्ञातून जे शेष अन्न रहाते ते
सेवन केल्याने समग्र पापांचा नाश होतो. आणि
चित्तशुद्धी होते म्हणजे थोडक्यात स्वधर्माचरणाने जे
प्राप्त होते त्याचा विनियोगही स्वधर्मानुसारच करावा.

© www.madhaveeraghuveer.com

सृष्टीचक्राला बाधक न ठरता आपले जीवन सृष्टी नियमांनुसार समृद्ध करत जायला हवे.
हळूहळू एक एक पायरी चढत जाऊन ज्ञान आत्मसात करावे अशा रीतीने वर्तन राखेल तर या यज्ञामध्ये आपली जी सांगीतली आहे ती सात्विकच असेल.

(53) वैश्वदेवादि ब्रह्मोक्त कर्म (यज्ञ) करून शेष राहिलेले अन्न म्हणजे अमृतच होय. त्याचे सेवन केले तर सर्व पापांचे हरण होते.

वर सांगितलेले पाच यज्ञ केल्यामुळे अजाणता घडणाऱ्या पाच प्रकारच्या हिंसांचे पातक लागत नाही.

जीवनात प्राप्त झालेल्या ज्ञान व धनाचा विनियोग कसा करावा याची मर्यादा धर्मानेच घालून दिली आहे.

अ - धर्माय - धर्माने व्यक्ती व समाजाची धारणा होते. धर्म जगला तर माणूस जगेल.

ब - यशसे - प्रत्येकाने आपले काम चोख केले तर राष्ट्र बलवान होईल. हे यश धवल असावे यासाठी सावध असावे. सदाचाराचे यश असावे. भ्रष्टाचाराचे नको.

Sunday 26

क - स्वजनाय - आपल्या ज्ञानाचा व धनाचा लाभ स्वजनांना करून द्यावा. स्वजन म्हणजे नातेवाईक इतका संकुचित अर्थ नसून राष्ट्रातील सर्व लोक म्हणजे स्वजन.

ड - अर्थाय - म्हणजे पैशाची व्यवस्थित गुंतवणूक

© www.madhaveeraghuveer.com

| March | Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
|---|---|---|---|---|---|---|
| | Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| | Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| | Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| | Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| | Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| | Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| | Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April | Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
|---|---|---|---|---|---|---|
| | Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| | Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| | Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| | Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| | Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| | Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| | Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

करून त्यात वृद्धी करणे.
इ- कमाय - या सर्वांतून जो पैसा उरेल तो पंचेंद्रियांच्या उपभोगासाठी वापरायचा.
म्हणजे सर्वांत अग्रक्रम धर्माला व शेवटचा कामाला हवा. परंतु स्वार्थी माणसांनी ही शिडी उलटी केली आहे.

(१४) (१५) सृष्टिचक्राचे वर्णन - अ- अन्नातून प्राण्यांची उत्पत्ती ब- त्या अन्नाची निर्मिती वृष्टीतून क- वृष्टी/पर्जन्याची निर्मिती यज्ञातून होते. म्हणजे यज्ञात जी घृताहुती दिली जाते ती आदित्यमंडलात जाऊन पर्जन्यरूपात परिणत होते. ड- यज्ञ हा ऋत्विजांच्या कर्मातून निर्माण होतो. इ- कर्म ब्रह्म हे शब्दब्रह्मातून / वेदातून निर्माण होते. त्यामुळे सर्व यज्ञकर्मात परब्रह्म असतेच - नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।
ई- शब्दब्रह्म परमात्म्यापासून निर्माण होते. हे चक्र ज्यांना कळले ते सात्विक कर्म करतात. याउलट जे स्वार्थी असतात ते सृष्टिचक्राचा स्वतः सहित घात करतात.
इंद्रियांचा दास सृष्टीचा घात करतो.

(१६) जो या सृष्टीचक्राला अनुसरून वागत नाही तो पापी आयुष्याचा मनुष्य व्यर्थच जगतो.
वेदविहित कर्म म्हणजे सदाचारावर, नीतीवर, स्वार्थत्यागावर आधारलेली कर्मे! त्यांचे जो आचरण करत नाही, त्याच्यासाठी दोन विशेषणे वापरली आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

अध्याय आणि इन्द्रियाराम.

निषिद्ध कर्म - दारु पिणे, व्यभिचार करणे, सिगरेट ओढणे, हिंसा करणे, चोरी करणे. अशी त्याज्य कर्मे आचरली तर सृष्टीरूप यज्ञाचा विध्वंस होतो.

सृष्टियज्ञ उत्तम चालला तरच व्यक्ती सुखरूप राहणार. अन्यथा व्यक्तीचा नाश अटळ आहे.

(१७) यानंतर जो स्वतः आत्म्यातच रमलेला तृप्त आणि संतुष्ट असतो त्याला करण्यासारखे काहीच उरत नाही. आत्मतृप्ती हीच निष्काम कर्माची खूण आहे. एकवेळ चालायचे कसे हे कळले नाही तरी थांबायचे कुठे हे कळले पाहिजे. आता मला काही नको, मी तृप्त आहे ही भावना अंतःकरणात निर्माण होते. नाहीतर मनुष्य आशेच्या मागे धावत सुटतो. आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला।

यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गुवत्॥

ज्याच्या पायात ही आशारूपी बेडी पडते तो धावत सुटतो आणि जो या बेडीतून मुक्त होतो तो पंगु प्रमाणे स्थिर राहतो, असे हे नवल आहे.

येथे मानव हा शब्द वापरला आहे. मानव म्हणजे मनुष्य हा अर्थ आहेच. याशिवाय आणखी एक अर्थ आहे. बाहेर किंवा आत सर्व स्थळी जी ब्रह्मानुभूती येते तिला मान असे म्हणतात आणि त्याचे सदैव भजन करणारा तो मानव - ब्रह्मज्ञानी - होय. सृष्टीतील प्रत्येक मानवाला आत्मोन्नत झाले पाहिजे. मीच परब्रह्म आहे असा साक्षात्कार म्हणजे आत्मरति

© www.madhaveeraghuveer.com

समाचर- To the best of one's ability

# 29 April उदात्त - आसक्तीरहित कर्मे
Wednesday
Week 18
119-246
2009

(१८) सृष्टीचक्र कळले की कर्म निष्कामच होते. असा ज्ञानी पुरुष कामनापूर्तीसाठी नव्हे तर कामनानिवृत्तीसाठी स्वधर्म आचरतो. विषयांबद्दल त्याच्या मनात कामना निर्माण होत नाही. आत्मज्ञानी पुरुष कर्तव्ये करूनही काहीच करत नाही. (१९) असक्त म्हणजेच अनासक्त! तू अनासक्त होऊन कर्मे कर. कर्मे कोणती तर कर्तव्यकर्मे. कारण अनासक्त पुरुष कर्मे करीत असताना परमात्म्याला प्राप्त होतो. कर्म हीच त्याची उपासना होते. कर्म करून फलत्याग करायचा व नंतर फलत्यागाचाही त्याग करायचा कारण अन्यथा मी फलत्याग केला या सात्त्विक अहंकाराचे कुठेतरी सुप्तावस्थेत स्फुरण राहते. म्हणून अनासक्त होऊन कर्म आचर.

अनासक्त कर्मयोगामुळे शरीर निरोगी, उत्तम राहते. समाजाचा योगक्षेम उत्तम चालतो. चित्तशुद्धी होते. समाजाला आदर्श मिळतो. कर्माचा आनंद वाढतो. कर्म हीच उपासना होते.

(२०) भगवंत आता थोर ज्ञानवंत कर्मयोग्याचे उदाहरण सांगतात. जनकादि ज्ञानी पुरुषही कर्मद्वाराच परम सिद्धिला जाऊन पोहोचले. यासाठी तूही लोकसंग्रहाकडे दृष्टी देऊन देखील कर्म करण्यासच योग्य आहेस.

थोर पुरुष समाजाचे नेतृत्व करत असतात. जास्तीत जास्त लोक सन्मार्गाला लागावेत यासाठी लोकसंग्रह करायचा असतो. आसक्तिरहित होऊन अशा

समाचर - Best by all means उत्तम प्रकारे कर्म कर

© www.madhaveeragnuveer.com

लोकसंग्रहार्थ केलेले कार्य (उदा.) ... करीत नाहीत.
... अधिक ... :

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| June | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

2009

98604 15751

April 30 Thursday
Week 18
120-245

थोर मानवांनी जास्तीत जास्त लोकाभिमुख व्हायला हवे. ज्यांनी एकात्मज्ञानाची अंतिम अवस्था प्राप्त करून घेतली त्यांनीही कर्म टाळायचे नसते. आंधळ्याला डोळसाने रस्ता दाखवावा त्याप्रमाणे ज्ञानी माणसाने स्वत: आचरण करून धर्म स्पष्ट करून दाखवावा। यालाच लोकसंग्रह म्हणतात.

मार्गी अंधासरिसा । पुढे देखणाही चाले जैसा ।
अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा । आचरोनि ॥

☆ (२१) श्रेष्ठ पुरुष जे जे आचरण करतात अन्य लोकही तसेच वागतात. तो पुरुष जे काही प्रमाण मानतो लोक देखील त्याला अनुसरून वागतात.

मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे ।
अलौकिक नोहावे । लोकांप्रति ॥

संत स्वत: सिद्ध झाले तरी ते साधकावस्था टाकत नाहीत. श्रेष्ठजन झोपले तर समाज वाममार्गाला जाईल. म्हणून त्यांना नित्य जागरूकपणे असावे लागते

महाजनो येन गत: स पन्था: ।

(२२) (२३) (२४) भगवंत स्वत: कर्मयोगी आहेत. भगवंतांची ब्रह्मांडावर सत्ता आहे. केवळ संकल्पमात्रेने ते काहीही प्राप्त करू शकतात. त्यांना मिळवायचे काहीही शिल्लक नसते तरीही ते कर्म करतातच. कारण ते ज्या मार्गाने जातात त्याच मार्गाने इतर लोक जातात.

कर्म न करणे म्हणजे यज्ञकर्म टाळणे होय. एखाद्याला उत्तम पोहायला येत आहे. समोर एखादा बुडत असेल तरीही त्याने पाण्यात न उतरणे म्हणजे

श्रेष्ठपुरुषी (एकवचनी — परमात्मा, परिपूर्ण, आत्मसाक्षात्कारी श्रेष्ठ पुरुष

ज्ञानी माणसाने कोरडा उपदेश न करता अनुकरणातून आदर्श पुरवावेत.



| April Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

यज्ञकर्म टाळणेच होय. किंवा कुशल डॉक्टरने ऑपरेशन करायला नकार देणे म्हणजे सृष्टी-चक्राचा घातच आहे.

अतंद्रितः - सावध राहून कर्मे केली पाहिजेत. तशी कर्मे केली नाहीत तर लोक भ्रष्ट होतील आणि मी प्रजेचा घात करणारा बनेन. मी वर्णसंकर करणारा होईन असे भगवंत म्हणत आहेत.

स्वधर्मविहित कर्म केले नाही तर काय होईल ते २४ व्या श्लोकात स्पष्ट केले आहे. आईवडील आळशी असतील तर मुलेही आळशीच होणार याउलट आईवडील कष्टाळू, श्रद्धाळू, सद्गुणी व शिस्तप्रिय असतील तर मुलांमध्ये ते सर्व गुण उतरतीलच. मोठ्यांनी घालून दिलेल्या मार्गावरून लहान चालतात.

म्हणूनच ज्ञानी महापुरुषाने कर्मे करून लोकसंग्रह करून त्याची प्रेरणा इतरांनी दिली पाहिजे

(२५) (२६) कर्मांमध्ये आसक्त असणारे अज्ञानी लोक जसे कर्म करतात तसेच अनासक्त असणाऱ्या लोकशिक्षणाची इच्छा बाळगणाऱ्या विद्वानांनीही कर्म करावे. ज्ञानी माणसाने अज्ञानी लोकांच्या बुद्धीत भ्रम किंवा कर्मात अश्रद्धा उत्पन्न करू नये त्यांच्याकडून सर्व चांगली कर्मे करवून घ्यावीत. जसा ज्याचा अधिकार तसा त्याला उपदेश करावा. नाहीतर हे ही नाही आणि ते ही नाही अशी स्थिती होईल. अतोभ्रष्टः ततोभ्रष्टः

ज्ञानी पुरुषाने कर्म न करता नुसतेच ज्ञान सांगितले तर उलट अज्ञानी लोकांच्या हाताला आयते कोलीत मिळेल. निष्क्रिय होण्यासाठी दाखला मिळेल



Let him not unsettle the minds

जे तान्हे बालक आईच्या अंगावरचे दूध देखील कष्टाने पिते त्याला पक्वान्न देणे योग्य आहे का? त्याप्रमाणे ज्याच्या अंगी कर्म चांगल्या रीतीने करण्याची योग्यता नाही त्यांना थट्टेने देखील नैष्कर्म्याचा उपदेश करू नये.

सगळीच माणसे ज्ञानसंपन्न नसतात, त्यामुळे अज्ञ जनांचा बुद्धिभेद ज्ञानवंतांनी करू नये.

कर्म करणाऱ्या अज्ञानी जनांस अधिकार प्राप्त होण्यापूर्वीच ब्रह्मज्ञानाचा उपदेश करणे म्हणजे आंधळ्याला विहिरीत लोटण्यासारखेच आहे.

तत्त्वोपदेश धारण करण्यासाठी माणसाची पारमार्थिक बैठक तयार व्हावी लागते. त्याशिवाय सांगितलेले पचत नाही.

(२६) (२८) ज्ञानी आणि अज्ञानी माणसातील अंतर —

अज्ञानी माणूस देहाभिमानी असतो. मी कर्ता आहे असे तो मानतो. देह व इंद्रिये नाशवंत आहेत पण अज्ञानी त्यांनाच खरे मानतो.

दृश्य वस्तू (म्हणजे सृष्टीतील सर्व काही) हून द्रष्टा वेगळा आहे हे ज्ञानी जाणतो.



ज्ञानी कर्माच्या ठिकाणी आसक्ती ठेवत नाही व त्याला अज्ञानी माणसासारखा कर्तृत्वाभिमानही नसतो.

आत्मा सर्वदा अकर्ताच आहे. अहंतेचा निरास होताच शुद्ध आत्म्याची प्रचीती येते.

ज्ञानी हे देहामध्ये उदासीन वृत्तीने रहातात

© www.madhaveeraghuvee.com

04 May Monday
Week 19
124-241

2009

(२५) कर्माच्या शिडीवर चढून शिखर गाठले परंतु कर्मयोगी शिखर गाठल्यावरसुद्धा शिडी सोडत नाही. स्वधर्मकर्मरूप सेवेच्या शिडीचे महत्त्व तो समाजाला पटवीत असतो. तो सामान्य माणसाप्रमाणे कर्म करत राहतो उलट इतरांपेक्षा अनेक पटीने राबतो. आहार कमी असला तरी काम निरंतर होऊ दे. चंदनाचा सुगंध बाहेर सुटू दे. त्यामुळे त्याची शरीरयात्रा चालेल. शरीर, बुद्धी सतेज राहील. चित्त शुद्धी होऊन ज्ञान मिळेल. समाजातील देह टाकून जीवनाचा पवित्र आदर्श प्रकटेल.
कर्मयोग्याचे कर्म इतरांपेक्षा उत्कृष्ट असेल. शेतीतील एक म्हण आहे- खोली पेर पण ओली पेर! नुसते खोल नांगरून भागणार नाही कर्म खोल म्हणजे उत्कृष्ट तर केलेले असावेच पण त्यात ईश्वरार्पणतेची खोली आणि ओली असावी. परमार्थी कर्मयोग्याबद्दल अनेक गैरसमज आहेत. की परमार्थी आहे त्याने काही करायचे नाही. परंतु द्वारकेचा राणा घोड्यांना खरारा करतो सारथ्य करतो. गाई चारतो, शेण लावतो. त्याचप्रमाणे संतसुद्धा कुंभारकाम, विणकाम, न्हावी, वाणी असे काम करीत करीतच मुक्त झाले आहेत अरे॥ या दिव्य कर्मयोगापासून मनुष्य ढळतो कारण इंद्रियांचा विशिष्ट स्वभाव लक्षात येत नाही. अमुक हवे आणि तमुक नको या द्वंद्वांनी इंद्रिये वेढलेली असतात. हे काम आणि क्रोध आपल्यामागे 'हे दे आणि ते टाक

ज्ञानी मानतो की विश्व हे त्रिगुणांचे आहे. मानवी कर्मातून प्रकृतीचे गुणच प्रगट होतात. ∴ तो मनाने अलिप्त राहतो. आसक्तीने कर्म करणे म्हणजे साक्षीभाव प्रकृती कर्म करत आहे व मी पाहत आहे.



असे लक्षांत आणून देतात. त्यांची संगत टाळा अशी धोक्याची सूचना येथे भगवंत देत आहेत.

(२९) अकृत्स्नविद - एकांगी दृष्टी असणारे, पूर्णपणे न समजणारे। बहुतेक सर्व कलाकार हे काही प्रमाणात एकांगीच असतात. त्यांना ज्ञानी पुरुषाने विचलित करू नये. उलट त्याच्यापाशी कर्माची स्तुतीच करून त्याला कर्म करायला प्रवृत्त करावे. एकांगी असला तरी तो कलाकारच त्या कलेची प्रगती करू शकतो. त्याला पोरखेळ मानू नये. त्याला कर्मापासून परावृत्त करू नये. कारण त्याला चित्तशुद्धीद्वारा क्रमाक्रमाने मोक्षाचा अधिकार प्राप्त व्हायचा असतो.

(३०) कर्मयोगनिष्ठेच्या विवेचनाचा समारोप येथे होत आहे. (A) निराशी - नवीन गोष्टींची कामना नको.
(B) निर्मम - प्राप्त वस्तुविषयी ममता नको.
(C) विगतज्वर: - नष्ट झालेल्या वस्तुविषयी संताप नको.
या तीन गोष्टींचा अंशसुद्धा राहू नये ही अर्पण करण्याची कसोटी आहे.

युध्यस्व - यात युद्ध करण्याशीच केवळ संबंध नसून कर्तव्यकर्म करण्याशी आहे. सिद्धी-असिद्धी, अनुकूलता-प्रतिकूलता यामध्ये सम राहणे म्हणजेच विगतज्वर होणे. विशेष - जेव्हा साधकाचा एकमेव उद्देश परमात्मप्राप्तीचा होतो तेव्हा त्याच्याजवळील सामुग्री (वस्तू, परिस्थिती) हे साधन होते. भगवंतांनी जसे दिले तसे त्यांना अर्पण करायचे त्यात उत्कृष्ट-निकृष्ट असा भेद नसतो. याठिकाणी युद्धासारखे घोर कर्म सुद्धा समभावाने करता येते.

(२९) सर्वसामान्य मंद अज्ञानी माणसे कर्मफळाच्या आशेने वावरत असतात त्यांना हिणवू नये. स्वतःच्या आचरणाने त्यांच्या जीवनाला वळण लावावे

©www.madhaveeraghuveer.com

कर्म अनिवार्य आहे. ते सेवाभावाने करावे. काय देता यापेक्षा कोणत्या भावनेने याला महत्व आहे. नोटेवरच्या शिक्क्याला महत्व आहे कागदाला नाही.

# 06

May
Wednesday
Week 19
126-239

2009

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

9.00 तर इतर कर्मांची काय कथा? जेव्हा शरीर
मी नाही माझे नाही. माझ्यासाठी नाही असा भाव
10.00 उत्पन्न होतो तेव्हाच समभाव असतो.
निर्मम - सामान्य माणूस आणि संत यांतील अंतर
11.00 संत हे प्रपंचात (असल्याप्रमाणे) दिसतात पण
सामान्य माणसे प्रपंचात असतात.
12.00 सामान्य माणूस आंब्यातील कोयीप्रमाणे असतो
तर संत चिंचेतल्या बी प्रमाणे असतात.
1.00 (31) गुणांमध्ये दोष पहाणे याला असूया म्हणतात.
असूयारहित माणसाला इथे अनसूयन्तः म्हटले
2.00 आहे. श्रद्धावन्तः - जिथे श्रद्धा असते तिथे काही
अंशी दोषदृष्टी राहू शकते म्हणून हे दोन्ही शब्द
3.00 जोडून घेतले आहेत. दोषदृष्टीरहित पूर्ण श्रद्धावान
होण्यास सांगत आहेत.
4.00 भगवंतांचे मत उत्तम आहे परंतु भगवंत
किती आत्मस्तुति करत आहेत असे भाव मनात
5.00 येणे हीच दोषदृष्टी आहे. मत म्हणजे सिद्धान्त!
(32) परंतु जे माझ्या या मतात दोषदृष्टी ठेवून
6.00 याचे अनुष्ठान करत नाहीत त्यांना संपूर्ण ज्ञानात
मोहित आणि अविवेकी मनुष्यांना नष्ट झालेलेच
7.00 समजा. कारण त्यांचे पतनच होते.
अशा अधम जनांना धर्म व सदाचार मानवत
8.00 नाही इंद्रियांचे चोचले पुरवण्यासाठी ते तत्पर असतात.
ते नास्तिक असतात. अनेक पापांना ते बळी पडतात.
अशा तामसी माणसांपासून विशेष सावध असावे.

© www.madhaveeragnuveer.com

(33) विषय हे घातुक असतात. इंद्रिये आणि विषय मानवाला आडमार्गाला नेतात. कोणत्याही शहाण्या माणसाने इंद्रियांचे लाड करु नयेत.

मनुष्य विषयांना बळी का पडतो? त्याचे स्पष्टीकरण या श्लोकात भगवंत करतात.

पूर्वजन्मकृत धर्म-अधर्म, इच्छा, वासना इ० च्या या जन्मात अभिव्यक्त झालेला संस्कार म्हणजे प्रकृती। किंवा प्राचीन संस्कारांच्या अधीन राहण्याचा स्वभाव म्हणजे प्रकृती. सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि।

भगवंताच्या अवताराप्रमाणे त्या त्या योनीमध्ये भिन्नता रहाते पण परवशता नसते. ज्ञानी महापुरुषा-कडून त्यांच्या शुद्ध प्रकृतीच्या विरुद्ध क्रिया होणार नाही नदीच्या प्रवाहाला रोखू शकत नाही. परंतु पाट काढून त्याला योग्य रीतीने वळवू शकतो

चेष्टते - प्रकृतीनुसार आपोआप क्रिया घडते ज्यात अहंकार असतो ते कर्म वेगळे असते. वृक्षाची पाने आपोआप हलतात त्यात शुभाशुभ कर्म नसते.

(34) इंद्रिये आणि त्यांचे विषय - शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यामध्ये अनुकूलता - प्रतिकूलता यावर माणसाचे राग द्वेष स्थित असतात. शेतकऱ्याला पाऊस प्रिय तर कुंभाराला अप्रिय असतो. एक विषयसुद्धा मनुष्याला सर्व काळ प्रिय किंवा अप्रिय नसतो. जसे थंडीत वारा नको वाटतो परंतु उन्हाळ्यात हवासा वाटतो. राग आणि द्वेषांना जर आपण वश झालो तर ते पुष्ट होतात आणि अशुद्ध प्रकृतीचे रूप धारण

©www.madhaveeraghuveer.com

करतात. पद्मपुराणात महर्षी व्यासांचे वचन आहे-

श्रूयतां धर्म सर्वस्वं श्रुत्वा चैवावधार्यताम्।
आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत्॥

हे मनुष्यांनो, तुम्ही धर्माचे सार ऐका आणि ऐकून त्याप्रमाणे आचरण करा की जे आम्ही आमच्यासाठी इच्छित नाही ते दुसऱ्यांसाठी करू नका.

समर्थ रामदासांचेही वचन आहे.

आपणास चिमोटा घेतला। तेणे जीव दुःखी जाला।
आपणावरुनि दुसऱ्याला। वोळखीत जावे॥

जे अनुकूल असते ते प्रिय वाटते आणि जे प्रतिकूल असते ते दुःखाला कारणीभूत ठरते. या राग-द्वेषाला दोन उपायांनी जिंकता येते.

१. शास्त्र व गुरु, संत्या वचनावर श्रद्धा ठेवून कर्म करावे.

२. भगवंताच्या चरणी संपूर्ण समर्पण करावे.

ज्याप्रमाणे भक्त पदार्थांना भगवंताचेच मानून त्यालाच अर्पण करतात त्याचप्रमाणे कर्मयोगी पदार्थांना संसाराचेच मानून संसाराला अर्पण करतात.

त्वदीय वस्तु गोविंद तुभ्यमेव समर्पये।

जो आपल्यासाठी काहीही मागत नाही तोच सेवा करू शकतो. ज्याची वस्तु त्याला देणे इतकाच भाव त्यात असावा. मोबदल्याची, मान-सन्मानाची कामना नको. आपण आपल्या हाताने आपले तोंड धुतले तर त्याचा मोबदला घ्यायचा का?

सेवा ही भावाने होत असते वस्तुने नाही.

पंडित जन म्हणतात - अश्रद्धा, असूया, दुष्टपणा मूढता, प्रकृतीचे दास्यत्व आसक्ती व द्वेष तथा परधर्मातील रुची हे सर्व मानवाला अधःपातित करतात. विषयांचे दास बनवतात. म्हणून इंद्रियांचे फाजील लाड न करता मानवाने सन्मार्गाने चालावे.

(३५) स्वधर्माची महत्ता - इतर धर्म बाहेरून गुणसंपन्न असले तरीसुद्धा त्या परधर्माचे पालन आपल्यासाठी विहित नसेल तर त्यात परिणामी दुःख आणि भयदायकच आहे. त्याऐवजी आपला धर्म थोडा उणा असेल तरीसुद्धा त्याचेच पालन करावे.

नोकरी करणारी स्त्री × गृहिणी

व्यावसायिक × नोकरदार

परधर्म मोहक वाटला तरी आपला धर्म आचरणे श्रेयस्कर

अर्जुनसुद्धा युद्धापेक्षा भिक्षा मागणे बरे असे म्हणत आहे परंतु क्षात्रियाचा धर्म युद्ध करणे हाच आहे. तोच स्वधर्म आहे. आणि मनुस्मृतीत म्हटले आहे -

धर्मो रक्षति रक्षितः। जो धर्माचे रक्षण करतो, धर्म त्याचे रक्षण करतो.



मनाचा निग्रह, इंद्रियदमन हे सर्वांचेच धर्म आहेत परंतु ब्राह्मणांचे हे स्वाभाविक धर्म आहेत. ते आचरताना त्यांना कष्ट होत नाहीत.

स्वधर्म म्हणजे स्वतःच्या वर्णाश्रमानुसार आणि अधिकारास योग्य असे स्वकर्तव्य!

ज्याला जे योग्य तेच त्याने करावे.

© www.madhaveeraghuveer.com

'कल्याणारेषु व्यापार' कधीही करु नये.
स्वकर्म वा स्वधर्माचे अधिष्ठान त्यागाचे असते. त्यागाशिवाय व्यापक विचार करता येत नाही. आणि त्यागाशिवाय पारमार्थिक वा भौतिक ऐश्वर्यही प्राप्त होत नाही.
स्वधर्म प्रारंभी कष्टदायक व परिणामी आनंददायक असतो.
दुसऱ्यांची सुंदर घरे पाहून आपली गवताची झोपडी मोडून टाकायची नसते.

रामदास की महाली । सौख्य कधी मिळाली ।
ती सर्व प्राप्त झाली । या झोपडीत माझ्या ॥

(३६) अधर्माधिष्ठित काम म्हणजे पाप - श्रद्धानाश, असूया, दुश्चित्त, मनाविषयी मूढता वा अज्ञान, प्रकृतिवशता वा इंद्रियदास्य, राग-द्वेषाचा प्रभाव, व परधर्माची आवड या सात गोष्टींमुळे मनुष्य पापाचरणास प्रवृत्त होतो.
गर्गसंहितेच्या अश्वमेधपर्वात दुर्योधन म्हणतो -

जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः
जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः ।
केनापि देवेन हृदि स्थितेन
यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि ॥

दुर्योधनाच्या हृदयात देव नसून काम क्रोधरूपी राक्षस होता असे बऱ्याच जणांचे होते. कळते पण वळत नाही. त्यांची धर्मात प्रवृत्ती होत नाही आणि अधर्मातून निवृत्ती होत नाही.
एवढे सर्व समजून, स्वधर्माचे महत्त्व जाणूनही अशी कोणती गोष्ट आहे की ज्यामुळे मनात नसूनसुद्धा बळजबरीने माणसे पाप करायला प्रवृत्त होतात?

© www.madhaveeraghuveer.com

वार्ष्णेय - या ठिकाणी अर्जुन भगवंताला वार्ष्णेय या नावाने संबोधितात. कारण यापूर्वीच्या श्लोकात भगवंतांनी स्वधर्म पालनाची प्रशंसा केली आहे आणि स्वधर्म हा वर्ण किंवा कुळाचा असतो. म्हणून मुद्दाम कुळाची आठवण करून देण्यासाठी वार्ष्णेय हे पद वापरले आहे.

(३६) अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना भगवंत कामाला भस्मासुर म्हणतात. या कामाची भूक भयंकर आहे. त्याची कधीही तृप्ती होत नाही. हा रजोगुणातून उत्पन्न झालेला आहे. सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण या तिन्हींमध्ये दहापटीचे अंतर आहे. तमोगुण (१) रजोगुण (१०) आणि सत्त्वगुण (१००) असे धरले तरी रजोगुण हा तमोगुणाच्या जवळचा आहे आणि सत्त्वगुणापासून खूप दूर आहे. त्याचा नाश होण्यासाठी सत्त्वगुणाचा उत्कर्ष झाला पाहिजे. रजोगुणाला सारखी कशाची तरी ईषणा असते. एकाची तृप्ती झाली असे वाटले तरी पुन्हा आणखी काहीतरी मिळवायचे उरतेच. विषयोपभोगाने याची तृप्ती होत नाहीच उलट अधिकच वाढते. माऊलीने या कामाचे यथार्थ वर्णन अगदी कडक शब्दात केले आहे — हे कामक्रोध म्हणजे प्रत्यक्ष यमधर्म आहेत. हे ज्ञानरूपी ठेव्यावर असणारे सर्प आहेत. हे विषयरूप दर्यांमध्ये राहणारे वाघ आहेत. हे भजनरूपी रस्त्यावरील वाटमारे मांग आहेत. हे देहरूपी डोंगरी किल्ल्याचे मोठाले दगड आहेत. हे मनात असलेल्या रजोगुणाचे वाढलेले आहेत. आशा यांच्या व्यापारावर देखरेख करते

© www.madhaveeraghuveer.com

त्या आशेची धाकटी बहीण भ्रांती आहे. त्या भ्रांतीच्या दासीपणाच्या जोरावर तृष्णा जगली आहे. त्या कामक्रोधांना मोहाच्या घरी खूप मान आहे. आपल्या करामतीने सर्व जगाला नाचविणारा जो अहंकार त्याची यांच्याशी देणघेवाण चालते. ज्याच्या पोटी असलेला सत्याचा मालमसाला काढून त्याऐवजी असत्याचा पेंढा भरला आहे असा जो दंभ तो यांचे कामक्रोधांनी जगात पुढे आणला आहे. यांनीच पवित्रता शांतीला वस्त्रहीन केले आणि तिच्या वस्त्रालंकारांनी मायारूपी मांगीण सजवली. अशा सजवलेल्या मायेकडून साधूंचे समुदाय नष्ट केले. यांनी वैराग्याची कातडी काढली. निग्रहाची मान जिवंतपणीच मुरगळली. यांनी संतोषरूपी वन तोडून टाकले. यांनी बोधरूपी रोपे उपटली आणि सुखाची भाषा ~~लिहून~~ पुसुन टाकली. यांनी धैर्यरूपी किल्ले पाडले आणि आनंदाचे लहान रोपटे उपटून टाकले. यांनी हृदयात विविध नावांचे निखारे पसरले. हे शरीरासहच निर्माण झाले आहेत. अंतःकरणाला चिकटून राहिले आहेत. पण कितीही धुंडाळले तरी हाताला लागत नाहीत.

पण हे हल्ला करायला उसळले म्हणजे कोणालाही आटोपत नाहीत. हे पाण्यावाचून बुडवतात अग्निवाचून जाळतात. शस्त्रावाचून ठार करतात.

हे शस्त्राविण साधिती । दोरेविण बांधती
ज्ञानियासी तरी वधिती । पैज घेउनी ॥

ज्ञानी माणसाला तर हे प्रतिज्ञापूर्वक ठार करतात

© www.maulaguruveer.com

या रजोगुणाचे वर्णन करताना समर्थ म्हणतात -

दुसऱ्याचे सर्व जावे। माझेचि बरे असावे।
ऐसे आठवे स्वभावे। तो रजोगुण॥

पण मग या त्रिगुणातून सत्वगुण ओळखायचा तो कसा? परोपकाराची तातडी। तो सत्वगुण॥

गीतेतही उत्तम भक्ताची लक्षणे सांगताना सर्वभूतहिते रताः। असे सांगितले आहे. शिवाय तुकाराम महाराजही एका अभंगात म्हणतात.

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा॥

जिथे सत्वगुण वास करतो तिथे परमेश्वराची अनुभूती येते. म्हणून सत्वगुणाची कास धरायला हवी.

तमोगुणातून रजोगुणाकडे व रजोगुणातून सत्वगुणाकडे वाटचाल व्हायला हवी. कामक्रोधाचा पुरता बंदोबस्त करायला हवा.

वर केलेले कामक्रोधांचे वर्णन अगदी जळजळीत शब्दात केले आहे. पण यातून सुटका कशी मिळवायची? तर यावर उपाय निश्चित आहे.

हे कामक्रोध अगदी प्रबळ असले तरी यांच्यावर मात मिळवता येते. यांना जिंकून जर तुम्ही पुढे जाल तर इंद्रिये तुमची दास होतील. तुम्हाला आत्मोन्नतीचा मार्ग सापडेल. तुम्ही स्वकर्माला, स्वधर्माला चिकटून राहिलात की हेच काम क्रोध तुम्हाला शरण येतील पण तुम्ही त्यांना कधीही शरण जाऊ नका असे भगवंत म्हणतात.

(36)

परमात्म्याची प्राप्ती सहजासहजी होत नाही कारण त्यामध्ये तीन दोष आड येतात.

१. मल  २. विक्षेप  ३. आवरण
धूर  धूळ  वेष्टन

पूजापाठ, स्वधर्मपालन, भगवतभजन इ० द्वारा चित्तशुद्धी होते आणि काम क्षीण होतो.

१. धुराने वेढलेल्या अग्नीला तेज नसते. पण अग्नीच्या तापाचा अनुभव असतो.

२. कामाची मध्यम अवस्था म्हणजे धुळीने माखलेला आरसा.

३. कामाची सर्वात वाईट अवस्था ही वेष्टनाने आवृत असलेल्या गर्भाप्रमाणे असते. त्यामुळे गर्भाचे यथार्थ ज्ञान होत नाही.

कामाच्या आवरणामुळे ज्ञान व विवेक झाकले जातात. कामनांचा त्याग कष्टदायक असतो परंतु कामनांची अपूर्ति ही त्याहून क्लेशदायक असते.

असा हा काम अनर्थ घडविणारा पण शुभ वासना असणे गैर नाही. धर्माच्या चौकटीत राहून कामनांची तृप्ती करणे गैर नाही. पण कामाला नीतीची चौकट आवडत नाही तो उद्दाम होतो, माजतो. त्यामुळे माणसाची विवेकशक्ती, ज्ञान, धर्म मारले जातात आणि मग समाजातील भ्रष्टाचार, बेपर्वाई, अस्वच्छता, अनीती यांना ऊत येतो.

चांगली वासना जर धर्माला धरून असेल तर

ते योग्यच आहे. सातव्या अध्यायात भगवंत म्हणतात -
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ||
म्हणजे काम तितका वाईट नाही, त्याची दुसरी
चांगली बाजू सुद्धा आहे.

(३९) काम हा ज्ञानाचा शत्रू आहे. कामाची विषयोपभोगाने
तृप्ती करू म्हटले तर तो कदापि तृप्त होत नाही.
उलट अधिकच वाढतो. ज्याप्रमाणे अग्नीत घृत
घालून शमवण्याचा प्रयत्न केला तर तो वृद्धी
पावतो. यासाठी विषयोपभोग सदोष आणि
अनर्थकारी आहेत असा बुद्धीचा निश्चय करून
त्याकडे मन जाऊ देऊ नये. यासाठी मन सात्विक
गोष्टींकडे वळवावे. ऐहिक सुखविषय आणि त्यांचे
अर्जन, रक्षण व नाश कष्टप्रद असतात अशी मनाची
खात्री झाली की त्याविषयीची तृष्णा नष्ट होते.
अनल - अग्नी - न विद्यतेऽलं पर्याप्तिर्यस्य सः अनलः |
भोज्य अथवा पेय वस्तुला ग्रहण करूनही ज्याची
तृप्ती होत नाही त्याला अनल म्हणतात.
हा काम दुष्पूर आहे. याची कधीही तृप्ती होत
नाही. कामामुळे विवेक झाकला जातो आणि
मनुष्य परमात्मप्राप्तीकडे प्रगती करू शकत नाही.
काम हा नित्यशत्रू आहे.

Sunday 17

(४०) हा काम इतका बलवान कशामुळे होतो आणि
त्याचे अधिष्ठान काय असते याचे रहस्य
उलगडताना भगवंत सांगतात - इंद्रिये, मन आणि
बुद्धी ही ह्याची निवासस्थाने आहेत. आणि कोणत्याही

© www.madhaveeraghuveer.com

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

शत्रूचा विनाश करण्यासाठी त्याचे आश्रयस्थान कोणते हे पाहून त्याचा नाश करावा.

पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, संकल्पात्मक मन आणि निश्चयात्मक बुद्धी असे मिळून एकंदर बारा कामाची अधिष्ठाने आहेत.

निष्काम कर्मासाठी आणि ज्ञानप्राप्तीसाठी काम जिंकावाच लागतो. संयमी पुरुषालाच ज्ञान प्राप्त होते त्याला ज्ञान प्राप्त करून घ्यायचे असेल, जो मुमुक्षु आहे त्याने या कामाला जिंकून घ्यावे. कसे ते पुढील श्लोकात सांगतात-

४१) प्रथम इंद्रियांना वश करून नंतर या कामरूपी पाप्याला निश्चयपूर्वक मारून टाक. मनाला जिंकले की कामाचा उपशम होतो. त्याप्रमाणे कोळी चंचल माशाला प्रथम पकडतो त्याचप्रमाणे प्रथम मनाला जिंकावे. मन एकदा जिंकले की इंद्रिये स्थिरावतात. काम हा पापस्वरूप असून तो ज्ञान-विज्ञानाचा नाश करतो. भौतिकशास्त्रावर आधारलेले ते विज्ञान असे आपण समजतो. इथे मात्र शास्त्रप्रचीती आणि गुरुप्रचीती म्हणजे ज्ञान आणि आत्मप्रचीती म्हणजे विज्ञान असा अर्थ आहे.

४२) आत्म्याचे ज्ञान ते आत्मज्ञान - कामाला जिंकण्यासाठी शुद्ध आत्म्याचा आश्रय करावा, त्याचाच बोध करून घ्यावा हा भावार्थ!

पर म्हणजे सूक्ष्मतम.

देह, देहाची इंद्रिये, पंच तन्मात्रा त्यांच्या पलीकडे असलेले मन, मनाच्या पलीकडे बुध्दी हे सर्व एकापेक्षा एक वरचढ आहे. आणि बुध्दीच्या पलीकडे जो आत्मा आहे तो निरंजन, निराकार व शाश्वत आहे. त्या परमात्म्याचा प्रत्यय आला की विषयांचे रस निवृत्त होतात.

ज्याने दुधाविषयी नुसतेच ऐकले आहे तो अज्ञानी, ज्याने प्रत्यक्ष दूध पाहिले आहे तो ज्ञानी आणि जो दूध पिऊन धष्टपुष्ट झाला आहे तो विज्ञानी असे म्हटले आहे.

अनासक्त कर्मयोगातून आत्मज्ञानाची अशी पुष्टता लाभत असते.

आत्मज्ञान झाले की महाभयंकर कामरूप शत्रुसुध्दा जिंकता येतो. अर्जुनाने हेच करावे यासाठी भगवंत त्याला सांगतात.

(४३) महाबाहो - विशाल आणि बलवान भुजा असलेला अर्थात शूरवीर असा तू आहेस. तू या कामरूप शत्रूचे दमन करण्यास समर्थ आहेस, असे सुचवतात. इथे कामाला दुरासदम् म्हणजे दुर्जय शत्रू म्हटले आहे, ते त्यापासून अधिक सावध रहाण्यासाठी, निराश होण्यासाठी नव्हे. आणि दुर्जय म्हणजे जिंकण्यासाठी कठीण आहे परंतु अशक्य नाही आणि तुझ्यासारख्याला तर ते निश्चितच शक्य आहे.

© www.madhaveeradhuveer.com

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 2 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 2 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 2 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 2 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 2 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 2 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 3 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 3 |

**उपसंहार** – निष्काम कर्मयोगाची थोरवी या अध्यायात सांगितली. कर्मनिष्ठा निर्माण झाली की ज्ञान प्राप्त होते. निष्काम कर्माने चित्तशुद्धी होते. शुद्ध चित्तामुळे श्रवण उत्तम घडते. त्यामुळे बलवान इंद्रिये स्वाधीन होतात. मन-बुद्धी स्थिरावतात. निदिध्यास लागतो व त्याद्वारे आत्मसाक्षात्कार होऊन मोक्षप्राप्ती होते.

देखणे ते चेहरे जे प्रांजळाचे आरसे
गोरटे की सावळे या मोल नाही फारसे

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे
मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे ||